**अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण-२००८**

**महाराष्ट्र शासन**
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३/ ऊर्जा-७,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक: १४ ऑक्टोबर, २००८

**प्रस्तावना:**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन शासनाने १९९६ पासून अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताच्या विकासासाठी प्रोत्साहनात्मक धोरणे वेळोवेळी निर्गमित केली आहेत. ही धोरणे राज्यात यशस्वीपणे राबविण्यात आली. या विविध धोरणांतर्गत मार्च, २००८ अखेर २२९३ मे.वॅ. क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प राज्यात कार्यान्वित आहेत व संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य दुस-या क्रमांकावर आहे.

केंद्र शासनाने विद्युत अधिनियम २००३, च्या तरतूदींनुसार राष्ट्रीय विद्युत धोरण (National Electricity Policy ) व वीजदर धोरण (Tariff Policy) देखील निर्गमित केले आहे. या दोन्ही धोरणात नित्यनुतनशील ऊर्जा स्त्रोतांच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना करावी अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने पवन ऊर्जा प्रकल्प, उसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प, कृषि अवशेषापासून वीज निर्मिती प्रकल्प, शहरी घन कच-यापासून वीज निर्मिती प्रकल्प व लघुजल विद्युत प्रकल्पांसाठी वीज खरेदीचे दर व इतर अटी आणि शर्ती याबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. तसेच राज्यातील वीज परवानाधारक व इतरांना नित्यनुतनशील ऊर्जा स्त्रोतातून निर्मित वीज आयोगाने निश्चित केलेल्या प्रमाणात खरेदी करणे बंधनकारक केले आहे. यासाठी केलेल्या नियोजनाप्रमाणे राज्यात दरवर्षी १००० मे.वॅ. क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करावे लागतील.

राज्यात यापूर्वी निर्गमित केलेल्या धोरणांचा तसेच अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील अडीअडचणींचा विचार करुन नवीन धोरण निर्गमित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. अनुषंगाने दि. ४/०९/२००८ च्या मंत्रिमंडळ बैठकीत नवीन धोरणावर विस्तृत चर्चा होवून मंत्रिमंडळाने नवीन धोरणास मान्यता दिली आहे.

**शासन निर्णय :**

१.० नवीन धोरणाअंतर्गत २००० मे.वॅ. क्षमतेचे पवन ऊर्जा निर्मिती प्रकल्प, १००० मे.वॅ. क्षमतेचे उसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प/ वीज निर्मिती प्रकल्प, ४०० मे.वॅ. क्षमतेचे कृषि अवशेषापासून वीज निर्मिती प्रकल्प व १०० मे.वॅ. क्षमतेचे लघुजल विद्युत प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून या प्रकल्पांना खालील सोयी आणि सवलती देय होतील. या सर्व सोयी सवलती ऊर्जा अंकुर निधी अंतर्गत आस्थापित होणा-या सर्व प्रकल्पांना देखील देय होतील. धोरणांतर्गत निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर नवीन धोरण निर्गमित करण्यात येईल.

१.९ या धोरणांतर्गत देय असलेल्या सोयी व सवलती प्रकल्पाच्या प्रवर्तकांना / विकासकांना / गुंतवणुकदारांना प्राप्त करावयाच्या असतील तर या धोरणांतर्गत कार्यान्वित होणा-या प्रकल्पातील निर्मित वीजेपैकी ५० टक्के वीज दीर्घ मुदतीच्या वीज खरेदी कराराने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या दराने विकणे बंधनकारक राहील. उर्वरित ५० टक्के वीज महाराष्ट्रात विकणे बंधनकारक राहील.

२.० या धोरणाअंतर्गत सर्व प्रकारच्या व सर्व क्षमतेच्या अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांना देय सोयी-सवलतीकरिता पात्र होण्यासाठी देय असलेले मुलभूत सुविधा संमती पत्र मान्य करण्याचे अधिकार शासनास राहतील. यासाठी प्रकल्पाचा प्रस्ताव प्रवर्तक/ विकासक महाऊर्जास सादर करतील. महाऊर्जा प्रस्तावाची तपासणी करेल. महाऊर्जा त्यांच्या शिफारशी नमूद करुन प्रस्ताव शासनास सादर करेल. शासनाच्या मान्यतेनंतर महाऊर्जाव्दारे मुलभूत सुविधा संमतीपत्र दिले जातील.

२.०१ या धोरणांतर्गत प्रस्तावित ३५०० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पाचा बृहत आराखडा महाऊर्जा तयार करेल व शासनाच्या मान्यतेसाठी सादर करेल. शासन मान्यतेनंतर बृहत्त आराखडा महाऊर्जातर्फे स्वतंत्रपणे निर्गमित केला जाईल. तसेच या धोरणांतर्गत कार्यान्वित करावयाच्या प्रकल्पाबाबतची तपशिलवार कार्यपध्दती शासनाव्दारे स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल.

**३.० पवन ऊर्जा प्रकल्प**

३.०१ या धोरणांतर्गत २००० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पांना खालील सोयी सवलती देय असतील.

**३.०२ निष्कासन व्यवस्थाः-**

३.०२.१ प्रकल्पासाठी लागणा-या लघु दाब, उच्च दाब आणि अति उच्च दाब केंद्रांचे व त्यांना लागणा-या पारेषण व वितरण वाहिन्यांचे सर्वेक्षण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी व महाऊर्जा संयुक्तपणे करतील. सर्वेक्षणाप्रमाणे उभारण्यात येणारी उच्च दाब व अतिउच्च दाब उपकेंद्रे, त्यांना लागणा-या अतिउच्च दाबाच्या पारेषण व वितरण वाहिन्यांची कामे खाजगी प्रवर्तक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या तांत्रिक प्रमाणानुसार (Technical Specifications) व त्यांनी मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी / महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करुन घेतील. या निष्कासन व्यवस्थेमध्ये अस्तित्वात असलेली उपकेंद्रे आणि पारेषण व वितरण वाहिन्यांमध्ये जे काही सुदृढीकरण अथवा बदल करावे लागतील, त्यांचाही समावेश असेल.

३.०२.२ प्रकल्पांच्या ठिकाणांपासून ते उच्च दाब व अति उच्च दाब उपकेंद्रापर्यंत जोडल्या जाणा-या ३३ के.व्ही.दाबाच्या वाहिन्यांचाही समावेश या निष्कासन व्यवस्थेमध्ये असेल.

३.०२.३ निष्कासन व्यवस्था कार्यान्वित झाल्यावर महापारेषण/महावितरण कंपनीकडे हस्तांतरित करण्यात येईल. निष्कासन व्यवस्थेची मालकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण/पारेषण कंपनीकडे राहिल. तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण/पारेषण कंपनीव्दारे केली जाईल.

H-2
4 7

३.०२.४ **निष्कासन व्यवस्थेचा खर्च :-** हरित ऊर्जा निधीतून देय असलेल्या सवलतीसाठी महापारेषण/महावितरण कंपनीने प्रमाणित केलेली कंपनीच्या मान्यताप्राप्त अंदाजपत्रकातील रक्कम व निष्कासन व्यवस्थेवर झालेला प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल,ती रक्कम निष्कासन व्यवस्थेचा खर्च म्हणून गृहित धरली जाईल.

३.०२.५ **निष्कासन व्यवस्थेच्या खर्चाचा हरित ऊर्जा निधीमधून परतावा :-**

**अनुदानः-** सदर निष्कासन व्यवस्था महापारेषण/ महावितरण कंपनीकडे पूर्णतः हस्तांतरित झाल्यानंतर खाजगी प्रवर्तकांनी स्वखर्चाने उभारुन, कार्यान्वित केलेल्या निष्कासन व्यवस्थेच्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून महाऊर्जातर्फे प्रवर्तकास हरित ऊर्जा निधीच्या उपलब्धतेनुसार यथावकाश वितरित करण्यात येईल.

३.०३ **पोहोच रस्ते :-**

३.०३.१ नवीन प्रकल्प उभारण्यापूर्वी पवन ऊर्जा प्रकल्पांच्या परिसरात प्रस्तावित रस्त्यांचा आराखडा विकासक / **प्रवर्तक** महाऊर्जास सादर करेल.नियोजित पोहोच रस्त्यांचा प्रकल्प अहवाल सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या सल्ल्यानुसार व अंदाजित किंमतीसह तयार करुन महाऊर्जा शासनास मान्यतेसाठी सादर करेल. शासनाने मान्य केलेल्या प्रकल्प अहवालाप्रमाणे महाऊर्जा पोहोच रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करुन घेईल. यासाठी लागणारा १०० टक्के खर्च हरित ऊर्जा निधीमधून अनुदान म्हणून देय होईल.

३.०३.२ पवन ऊर्जा प्रकल्पाच्या यंत्रसामुग्रीची वाहतूक करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग/ जिल्हा परिषद यांच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची सुधारणा / मजबूतीकरण/ सुदृढीकरण इ. कामे करण्याची आवश्यकता भासल्यास पवन ऊर्जा प्रवर्तक / विकासक सदर कामे स्वखर्चाने करुन घेतील. या कामासाठी त्यांना संबंधित विभागाची म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जिल्हा परिषद यांची परवानगी घ्यावी लागेल. तथापि, या कामासाठी येणा-या खर्चाचा परतावा प्रवर्तकांना / विकासकांना हरित ऊर्जा निधीतून देय होणार नाही.

३.०४ **विद्युत शुल्कः-** या धोरणांतर्गत राज्यात आस्थापित होणाऱ्या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेचा वापर उद्योगांनी निजी वापरासाठी केल्यास प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षाकरिता विद्युत शुल्क आकारले जाणार नाही. ही सवलत तिस-या घटकास वीज विक्रीस (थर्ड पार्टी सेल ) देय होईल.

३.०५ **सहकार क्षेत्रास प्रोत्साहन :-** सहकारी संस्थांना पवन ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून सहकारी संस्थांनी पवन ऊर्जा प्रकल्प आस्थापित व कार्यान्वित केल्यास त्यांना हरित ऊर्जा निधीमधून प्रकल्पाच्या एकूण भागभांडवला पैकी ११ टक्के भाग भांडवल, अनुदान म्हणून देण्यात येईल.

३.०६ **लेटर ऑफ क्रेडिट :-** प्रवर्तकाने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस वीजेची विक्री केल्यास प्रवर्तकांचे पैसे विहित मुदतीत मिळावेत म्हणून महावितरण कंपनी प्रवर्तकाला लेटर ऑफ

क्रेडिटची सुविधा उपलब्ध करुन देईल. लेटर ऑफ क्रेडिट सुरु ( ओपन ) करण्याचा खर्च महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस महाऊर्जामार्फत हरित ऊर्जा निधीतून १०० टक्के अनुदान म्हणून दिला जाईल.

३.०७ **भूविज्ञान व खनिकर्म विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र:-** ज्या पवन ऊर्जा निर्मितीक्षम ठिकाणी भूविज्ञान व खनिकर्म विभागाच्या परवान्याची आवश्यकता नाही, अशी ठिकाणे भूविज्ञान व खनिकर्म विभागाने अधिसूचित करावीत. अशा ठिकाणी प्रवर्तकाने पवन ऊर्जा प्रकल्प उभारल्यास त्यासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" सादर करण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्या ठिकाणी भूविज्ञान व खनिकर्म विभागाच्या "ना हरकत प्रमाणपत्राची" आवश्यकता आहे, ती ठिकाणेही अधिसूचित करावीत. अशा स्थळांवर पवन ऊर्जा प्रकल्पासाठी प्रवर्तकाकडून भूविज्ञान व खनिकर्म विभागाचे "ना हरकत प्रमाणपत्र" आवश्यक राहील. यासाठी राज्यातील पवन ऊर्जा निर्मिती ठिकाणांबाबतची माहिती व नकाशे प्रवर्तकाव्दारे महाऊर्जामार्फत भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयास उपलब्ध करण्यात येतील.

३.०८ **विकास आयुक्त (उद्योग) यांचे नाहरकत प्रमाणपत्र:-** विकास आयुक्त (उद्योग) यांचे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्याचा कालावधी दोन आठवडयाचा करण्यात यावा. प्रवर्तकाने पवन ऊर्जा प्रकल्पाकरिता विकास आयुक्त (उद्योग) यांची परवानगी घेतली असेल तर पवन ऊर्जा प्रकल्प गुंतवणूकदारांच्या नावे हस्तांतरित करताना त्या प्रकल्पाकरिता पुन्हा विकास आयुक्त (उद्योग) यांचेकडून गुंतवणूकदाराच्या नावाने नव्याने स्वतंत्र "ना हरकत प्रमाणपत्र" सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

३.०९ **जकात कर /प्रवेश कर :-** पवन ऊर्जा प्रकल्पाच्या यंत्र सामुग्रीवर लागणा-या जकात कर/ प्रवेश कराचा १०० टक्के परतावा हरित ऊर्जा निधीतून महाऊर्जामार्फत देण्यात येईल.

३.१० **पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी भाडेतत्वावर शासकीय पडजमिनी :-** पवन ऊर्जा प्रकल्प विकासक / गुंतवणूकदार यांनी पवन ऊर्जा निर्मितीक्षम ठिकाणावरील आवश्यक असलेली शासकीय पडीक जमीन निश्चित करुन जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी केल्यास व नियोजनाच्या दृष्टीने जमिनीचा औद्योगिक वापर अनुज्ञेय असल्यास, सध्या राज्यातील वीजेची कमतरता लक्षात घेऊन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण करणे) नियम, १९७१ मधील तरतूदीनुसार, प्रचलित बाजारभावाच्या किंमतीवर प्राइम लेंडिंग रेटप्रमाणे भूईभाडे आकारुन जमिनीच्या उपलब्धतेनुसार प्रकरणपरत्वे वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून नियमित अटी व शर्तीवर ३० वर्षांच्या भाडेकराराने देण्यात येतील.

३.११ २६ फेब्रुवारी, २००४ च्या पवन ऊर्जा धोरणांतर्गत ७५० मे.वॅ. क्षमतेचे पवन ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर हे धोरण निर्गमित होईपर्यंत जी क्षमता कार्यान्वित झाली असेल त्या सर्व पवन ऊर्जा प्रकल्पांना या धोरणांतर्गत देय असलेल्या सर्व सोयी सवलती लागू रहातील.

४.० **ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प / वीज निर्मिती प्रकल्प :**

या धोरणांतर्गत १००० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पांना खालील सोयी सवलती देय असतील.

४.०१ **निष्कासन व्यवस्था:-**

४.०१.१ प्रकल्पासाठी लागणा-या लघु दाब, उच्च दाब आणि अति उच्च दाब केंद्रांचे व त्यांना लागणा-या पारेषण व वितरण वाहिन्यांचे सर्वेक्षण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी व महाऊर्जा संयुक्तपणे करतील. सर्वेक्षणाप्रमाणे उभारण्यात येणारी उच्च दाब व अतिउच्च दाब उपकेंद्रे, त्यांना लागणा-या अतिउच्च दाबाच्या पारेषण व वितरण वाहिन्यांची कामे खाजगी प्रवर्तक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या तांत्रिक प्रमाणानुसार (Technical Specifications) व त्यांनी मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी / महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करुन घेतील. या निष्कासन व्यवस्थेमध्ये अस्तित्वात असलेली उपकेंद्रे आणि पारेषण व वितरण वाहिन्यांमध्ये जे काही सुदृढीकरण अथवा बदल करावे लागतील, त्यांचाही समावेश असेल.

४.०१.२ प्रकल्पांच्या ठिकाणांपासून ते उच्च दाब व अति उच्च दाब उपकेंद्रापर्यंत जोडल्या जाणा-या ३३ के.व्ही.दाबाच्या वाहिन्यांचाही समावेश या निष्कासन व्यवस्थेमध्ये असेल.

४.०१.३ निष्कासन व्यवस्था कार्यान्वित झाल्यावर महापारेषण/महावितरण कंपनीकडे हस्तांतरित करण्यात येईल. निष्कासन व्यवस्थेची मालकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण/पारेषण कंपनीकडे राहिल. तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण/पारेषण कंपनीव्दारे केली जाईल.

४.०१.४ **निष्कासन व्यवस्थेचा खर्च :-** हरित ऊर्जा निधीतून देय असलेल्या सवलतीसाठी महापारेषण/महावितरण कंपनीने प्रमाणित केलेली कंपनीच्या मान्यताप्राप्त अंदाजपत्रकातील रक्कम व निष्कासन व्यवस्थेवर झालेला प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल,ती रक्कम निष्कासन व्यवस्थेचा खर्च म्हणून गृहित धरली जाईल.

४.०१.५ **निष्कासन व्यवस्थेच्या खर्चाचा हरित ऊर्जा निधीमधून परतावा :-**

**अनुदान:-** सदर निष्कासन व्यवस्था महापारेषण/ महावितरण कंपनीकडे पूर्णतः हस्तांतरित झाल्यानंतर खाजगी प्रवर्तकांनी स्वखर्चाने उभारुन, कार्यान्वित केलेल्या निष्कासन व्यवस्थेच्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून महाऊर्जातर्फे प्रवर्तकास हरित ऊर्जा निधीच्या उपलब्धतेनुसार यथावकाश वितरित करण्यात येईल.

४.०२ **विद्युत शुल्क**:- या धोरणांतर्गत राज्यात आस्थापित होणाऱ्या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेचा वापर उद्योगांनी निजी वापरासाठी केल्यास प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षाकरिता विद्युत शुल्क आकारले जाणार नाही. ही सवलत तिस-या घटकास वीज विक्रीस (थर्ड पार्टी सेल ) देय होईल.

४.०३ **भांडवली अनुदान**:- हरित ऊर्जा निधीतून सहवीज निर्मिती/ वीज निर्मिती प्रकल्पाच्या उच्चदाब / अतिउच्च दाब उपकेंद्रासाठी प्रति प्रकल्प रु. १ कोटी भांडवली अनुदान देण्यात येईल.

४.०३.१ सदर भांडवली अनुदान प्रकल्प किमान ८० टक्के प्लॅन्ट लोड फॅक्टरने किमान एक वर्ष सुरळीत चालल्यानंतर देण्यात येईल.

४.०४ सहकारी साखर कारखान्याने सहवीज/ वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित केल्यास त्यांना गाळपासाठी येणा-या ऊसावर ३ टक्के करातून १०० टक्के सूट पुढील १० वर्षासाठी देण्यात येईल. ही ऊसावरील खरेदी कराची सूट नविन प्रकल्पांप्रमाणेच सध्या कार्यान्वित प्रकल्पांनाही दहा वर्षाकरिता देण्यात येईल.

५.० **कृषिजन्य अवशेषांपासून ( बायोमास ) वीज निर्मिती प्रकल्प :-** या धोरणांतर्गत ४०० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पांना खालील सोयी सवलती देय असतील. या सोयी सवलती वर्ष २००७-०८ मध्ये कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांनाही देण्यात येतील.

५.०१ **निष्कासन व्यवस्था:-**

५.०१.१ प्रकल्पासाठी लागणा-या लघु दाब, उच्च दाब आणि अति उच्च दाब केंद्रांचे व त्यांना लागणा-या पारेषण व वितरण वाहिन्यांचे सर्वेक्षण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी व महाऊर्जा संयुक्तपणे करतील. सर्वेक्षणाप्रमाणे उभारण्यात येणारी उच्च दाब व अतिउच्च दाब उपकेंद्रे, त्यांना लागणा-या अतिउच्च दाबाच्या पारेषण व वितरण वाहिन्यांची कामे खाजगी प्रवर्तक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या तंत्रिक प्रमाणानुसार (Technical Specifications) व त्यांनी मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी / महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करुन घेतील. या निष्कासन व्यवस्थेमध्ये अस्तित्वात असलेली उपकेंद्रे आणि पारेषण व वितरण वाहिन्यांमध्ये जे काही सुदृढीकरण अथवा बदल करावे लागतील, त्यांचाही समावेश असेल.

५.०१.२ प्रकल्पांच्या ठिकाणांपासून ते उच्च दाब व अति उच्च दाब उपकेंद्रापर्यंत जोडल्या जाणा-या ३३ के.व्ही.दाबाच्या वाहिन्यांचाही समावेश या निष्कासन व्यवस्थेमध्ये असेल.

५.०१.३ निष्कासन व्यवस्था कार्यान्वित झाल्यावर महापारेषण/महावितरण कंपनीकडे हस्तांतरित करण्यात येईल. निष्कासन व्यवस्थेची मालकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण/पारेषण कंपनीकडे राहिल. तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण/पारेषण कंपनीव्दारे केली जाईल.

५.०१.४ **निष्कासन व्यवस्थेचा खर्च :-** हरित ऊर्जा निधीतून देय असलेल्या सवलतीसाठी महापारेषण/महावितरण कंपनीने प्रमाणित केलेली कंपनीच्या मान्यताप्राप्त अंदाजपत्रकातील रक्कम व निष्कासन व्यवस्थेवर झालेला प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल,ती रक्कम निष्कासन व्यवस्थेचा खर्च म्हणून गृहित धरली जाईल.

५.०१.५ **निष्कासन व्यवस्थेच्या खर्चाचा हरित ऊर्जा निधीमधून परतावा :-**

**अनुदान:-** सदर निष्कासन व्यवस्था महापारेषण/ महावितरण कंपनीकडे पूर्णत: हस्तांतरित झाल्यानंतर खाजगी प्रवर्तकांनी स्वखर्चाने उभारुन, कार्यान्वित केलेल्या निष्कासन व्यवस्थेच्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून महाऊर्जातर्फे प्रवर्तकास हरित ऊर्जा निधीच्या उपलब्धतेनुसार यथावकाश वितरित करण्यात येईल.

५.०२ विद्युत शुल्क:-- या धोरणांतर्गत राज्यात आस्थापित होणाऱ्या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेचा वापर उद्योगांनी निजी वापरासाठी केल्यास प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षांकरिता विद्युत शुल्क आकारले जाणार नाही. ही सवलत तिस-या घटकास वीज विक्रीस (थर्ड पार्टी सेल ) देय होईल.

६.० लघुजल विद्युत प्रकल्प : या धोरणांतर्गत नियोजित १०० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पांना खालील सोयी सवलती देय असतील.

६.०१ निष्कासन व्यवस्था:-

६.०१.१ प्रकल्पासाठी लागणा-या लघु दाब, उच्च दाब आणि अति उच्च दाब केंद्रांचे व त्यांना लागणा-या पारेषण व वितरण वाहिन्यांचे सर्वेक्षण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी व महाऊर्जा संयुक्तपणे करतील. सर्वेक्षणाप्रमाणे उभारण्यात येणारी उच्च दाब व अतिउच्च दाब उपकेंद्रे, त्यांना लागणा-या अतिउच्च दाबाच्या पारेषण व वितरण वाहिन्यांची कामे खाजगी प्रवर्तक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या तांत्रिक प्रमाणानुसार (Technical Specifications) व त्यांनी मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी / महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करुन घेतील. या निष्कासन व्यवस्थेमध्ये अस्तित्वात असलेली उपकेंद्रे आणि पारेषण व वितरण वाहिन्यांमध्ये जे काही सुदृढीकरण अथवा बदल करावे लागतील, त्यांचाही समावेश असेल.

६.०१.२ प्रकल्पांच्या ठिकाणांपासून ते उच्च दाब व अति उच्च दाब उपकेंद्रापर्यंत जोडल्या जाणा-या ३३ के.व्ही.दाबाच्या वाहिन्यांचाही समावेश या निष्कासन व्यवस्थेमध्ये असेल. लघुजल विद्युत प्रकल्पांची निष्कासन व्यवस्था ३३ के.व्ही.पेक्षा कमी दाबाची असल्यास त्याचाही समावेश निष्कासन व्यवस्थेमध्ये असेल.

६.०१.३ निष्कासन व्यवस्था कार्यान्वित झाल्यावर महापारेषण/महावितरण कंपनीकडे हस्तांतरित करण्यात येईल. निष्कासन व्यवस्थेची मालकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण/पारेषण कंपनीकडे राहिल. तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण/पारेषण कंपनीव्दारे केली जाईल.

६.०१.४ **निष्कासन** व्यवस्थेचा खर्च :- हरित ऊर्जा निधीतून देय असलेल्या सवलतीसाठी महापारेषण/महावितरण कंपनीने प्रमाणित केलेली कंपनीच्या मान्यताप्राप्त अंदाजपत्रकातील रक्कम व निष्कासन व्यवस्थेवर झालेला प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल,ती रक्कम निष्कासन व्यवस्थेचा खर्च म्हणून गृहित धरली जाईल.

६.०१.५ निष्कासन व्यवस्थेच्या खर्चाचा हरित ऊर्जा निधीमधून परतावा :-

अनुदान:- सदर निष्कासन व्यवस्था महापारेषण/ महावितरण कंपनीकडे पूर्णत: हस्तांतरित झाल्यानंतर खाजगी प्रवर्तकांनी स्वखर्चाने उभारुन, कार्यान्वित केलेल्या निष्कासन व्यवस्थेच्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून महाऊर्जातर्फे प्रवर्तकास हरित ऊर्जा निधीच्या उपलब्धतेनुसार यथावकाश वितरित करण्यात येईल.

६.०२ **विद्युत शुल्क**:- या धोरणांतर्गत राज्यात आस्थापित होणाऱ्या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेचा वापर उद्योगांनी निजी वापरासाठी केल्यास प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षाकरिता विद्युत शुल्क आकारले जाणार नाही. ही सवलत तिस-या घटकास वीज विक्रीस (थर्ड पार्टी सेल ) देय होईल.

६.०३ **भांडवली अनुदान**:- ५ मे.वॅ. क्षमते पर्यंतच्या कोल्हापूर पध्दतीचे बंधा-यावरील, धबधब्यांवरील व रन ऑफ रिव्हर प्रकारच्या जलविद्युत प्रकल्पांना देय असेल. ५,००० किलो वॅट पर्यंतच्या प्रकल्पांना ५०,०००/- रुपये प्रति किलोवॅट एवढे अनुदान देण्यात येईल. या अनुदानाची कमाल मर्यादा प्रति प्रकल्प रुपये १.५० कोटी एवढी असेल.

६.०३.१ प्रकल्पातील नियोजित वीज निर्मितीच्या किमान ८० टक्के वीज निर्मितीने प्रकल्प एक वर्ष सुरळीत चालल्यानंतर सदर भांडवली अनुदान देण्यात येईल.

७.० **इतर बाबी**: वरील सर्व बाबी व्यतिरिक्त प्रकल्पास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी घेतलेले सर्व निर्णय लागू राहतील. जसे वीजदर व तत्संबंधी बाबी, ऊर्जा खरेदी करार व तत्संबंधी बाबी. तसेच निजी वापराकरीता किंवा विजेची विक्री तिस-या घटकास केल्यास, त्यास लागू होणा-या बँकींग, व्हिलिंग, पारेषण व वितरण हानी आणि तत्संबंधी बाबी, इत्यादी.

८.० **इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या अंतर्गत तरतुदी** : इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या तरतुदीअंतर्गत अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतातून विद्युत निर्मितीस प्रोत्साहन देणे, निर्मित वीज ग्रीडशी जोडण्यासंबंधी योग्य उपाययोजना करणे, विजेची विक्री व अशा स्त्रोतातून निर्मित वीज, वितरण परवाने धारकांनी किती प्रमाणात खरेदी करावी, या बाबी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यकक्षेत आहेत. आयोगाने वेळोवेळी दिलेले निर्णय संबंधितांना लागू राहतील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या १) अनौपचारिक संदर्भ क्र. २५९/०८/व्यय-१६, दिनांक: १.१०.२००८ व २) अनौपचारिक संदर्भ क्र. २८/०८/करा.३ , दिनांक: ६.१०.२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक **२००८१०१५१७३७१९००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्यामकुल

( अरुण श्यामकुल )
विशेष कार्य अधिकारी

प्रति,

- सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई ( पत्राने )
- महासंचालक,महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण ,पुणे
- प्रधान सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
- मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

- अपर मुख्य सचिव , सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
- प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
- प्रधान सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव (नगर विकास-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, नियोजन बिभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- सचिव (उद्योग), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
- खाजगी सचिव, मा.मंत्री (ऊर्जा)
- खाजगी सचिव, मा.मंत्री (अपारंपरिक ऊर्जा )
- खाजगी सचिव, सर्व मा. मंत्री व सर्व मा. राज्यमंत्री
- सर्व परवानाधारक कंपन्या
- सर्व मंत्रालयीन विभाग
- ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने
- निवडनस्ती

------

अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण २००८ मध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग उर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. अपाऊ-२००९/प्र.क्र. १५२८/ऊर्जा ७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- ०३ ऑगस्ट,२००९

वाचा:- शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
क्रमांक : अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३/ऊर्जा-७,
दिनांक - १४.१०.२००८

**शासन निर्णय :**

अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण उपरोक्त संदर्भांकित दिनांक १४.१०.२००८ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केले आहे. सदर शासन निर्णयामधील निष्कासन व्यवस्थेचा खर्च, वीज निर्मिती प्रकल्प व भांडवली अनुदानासंदर्भातील संदिग्धता दूर करुन खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

| दिनांक १४.१०२००८ च्या शासन निर्णयातील तरतूदी | सुधारणा |
|---|---|
| १) कलम ९.१- या धोरणांतर्गत देय असलेल्या सोयी सवलती प्रकल्पाच्या प्रवर्तकांना/ विकासकांना/ गुंतवणूकदारांना प्राप्त करावयाच्या असतील तर या धोरणांतर्गत कार्यान्वित होणाऱ्या प्रकल्पातील निर्मित वीजेपैकी ५० टक्के वीज दीर्घ मुदतीच्या कराराने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या दराने विकणे बंधनकारक राहील. उर्वरित ५० टक्के वीज महाराष्ट्रात विकणे बंधनकारक राहील. | १) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताव्दारे निर्माण होणारी १०० टक्के वीज राज्यातील कोणत्याही अनुज्ञप्तीधारकास किंवा ग्राहकास विक्री करणे बंधनकारक राहील. तसेच जलसंपदा विभागांतर्गत २५ मे.वॅट पर्यंतच्या प्रकल्पातून निर्माण होणारी १०० टक्के वीज राज्यातील कोणत्याही अनुज्ञप्तीधारकास किंवा ग्राहकास विकण्यास मुभा राहील. |

| | |
|---|---|
| २) कलम-४- ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प/ वीज निर्मिती प्रकल्प- | २) ऊसाच्या चिपाडासहित कृषी अवशेषांपासून सहवीज निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांनादेखील कलम-४ अंतर्गत शासनाकडून लागू करण्यात आलेल्या सर्व सोयी सवलती देय राहतील. |
| ३) कलम ४.०३- हरित ऊर्जा निधीमधून सहवीज निर्मिती/ वीजनिर्मिती प्रकल्पाच्या उच्चदाब/अति उच्चदाब केंद्रांसाठी प्रति प्रकल्प रु. १ कोटी भांडवली अनुदान देण्यात येईल. | ३) प्रकल्पाच्या उच्चदाब/अति उच्चदाब उपकेंद्रांसाठी द्यावयाच्या प्रति प्रकल्प रु. १ कोटी भांडवली अनुदानासाठी सदर उच्चदाब/ अतिउच्चदाब उपकेंद्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी/ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. |

या धोरणांतर्गत देय असलेल्या सोयी व सवलती प्रकल्पाच्या प्रवर्तकांना/ विकासकांना/ गुंतवणूकदारांना प्राप्त करुन घ्यावयाच्या नसतील तर त्यांना प्रकल्पासाठी शासनाकडून मूलभूत सुविधा संमती पत्र घ्यावे लागणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स्मि.श.रानडे)
शासनाच्या उप सचिव

प्रति,

- सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
- मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मंबई- ४०० ०३२
- अपर मुख्य सचिव , सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- . प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
- प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
- प्रधान सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव (नगर विकास-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

- प्रधान सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- सचिव (उद्योग), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- सचिव,महाराष्ट्र नियामक आयोग, मुंबई( पत्राने )
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, वितरण कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
- महासंचालक,महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण ,पुणे
- खाजगी सचिव, मा.मंत्री, (ऊर्जा)
- खाजगी सचिव, मा.मंत्री, अपारंपरिक ऊर्जा
- खाजगी सचिव, सर्व मा. मंत्री व सर्व मा. राज्यमंत्री
- सर्व परवानाधारक कंपन्या
- सर्व मंत्रालयीन विभाग
- ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.
- निवडनस्ती

----------